# सातारा जिल्हा परिषद, सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय पत्ता : सातारा-कोरेगांव रोड,सदर बझार कॅम्प,सातारा ४१५००१

कार्यालय दूरध्वनी क्र. : (02162) 295053 e-mail – dyceogadstr@gmail.com


जाक्र.साप्रवि/आयटीसेल/Chatbot/ 3694 /2025 दिनांक- 30 /12 /2025

## जाहिर दरपत्रक मागणी

सातारा जिल्हा परिषद सातारा अंतर्गत विविध विभागांकडील विविध योजना व विकास कामांची माहिती Whatsapp Chatbot व्दारे उपलब्ध करुन देण्यासाठी Whatsapp Chatbot तयार करणेसाठी सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अक्र | कामाचे स्वरुप | कालवधी | Whatsapp Chatbot तयार करण्याचा अंदाजित खर्च | दरपत्रके सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | Whatsapp Chatbot तयार करणे, SMS facility, Authentication Conversations,Utility Conservations, One time verification करणे. | 7 दिवस | 49,000/- | दिनांक- 30 /12/2025 ते 07/01/2026 |

**कामाचे स्वरुप व दरपत्रक नमुना**

| Sr.No. | Particulars | Rate (Rs.) | Total Amount |
|---|---|---|---|
| 1 | Chatbot SMS facility Charges | | |
| 2 | Authentication Conversations | | |
| 3 | Utility Conversations | | |
| 4 | One time verification Charges | | |
| | GST% | | |
| | Total- | | |

**अटी व शर्ती :-**

1. सातारा जिल्हा परिषद साताराकडील विभागांकडील विविध योजनांची माहिती व विकास कामांच्या माहितीचा Whatsapp Chatbot तयार करणेचा आहे.
2. Whatsapp Chatbot हा सातारा जिल्हा परिषदेकडील वेबसाईट https://zpsatara.gov.in वर Intigrate करण्याचा आहे.
3. 4. Whatsapp Chatobt मराठी व इंग्रजी भाषेत असावा व Usege चा Dashboard उपलब्ध करुन देणेत यावा.
4. Whatsapp Chatbot मध्ये वरिष्ठांनी सूचित केलेप्रमाणे बदल करुन देणे बंधनकारक आहे.
5. सदर Whatsapp Chatbot चे विहित मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसे न झालेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा हे जो दंड निश्चित करतील त्यानुसार पुढील कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

6. पुरवठा आदेश देण्यापूर्वी सुरक्षा ठेव पोटी निविदा रकमेच्या 3% रक्कम चलनाने सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा सातारा येथे चनाने भरणा करण्याची आहे. तद्नंतर पुरवठा आदेश देण्यात येईल. सदरची रक्कम सदर कामाचे लेखापरिक्षण पूर्ण झालेनंतर मागणीनंतर परत करण्यात येईल.
7. अटी व शर्ती मान्य असलेबाबत रक्कम रु.500 च्या स्टँम्प पेपरवर करारनामा करुन देणेचा आहे.
8. Whatsapp Chatbot ॲप्लीकेशनमध्ये काही तांत्रिक बिघाड झालेस तसे संबंधित विभागास लेखी/ई-मेलव्दारे तत्काळ कळविण्यात यावे. तसेच सदरचा तांत्रिक बिघाड हा 12 तासात Solve करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहणार आहे.
9. Whatsapp Chatbot तयार करण्यासाठी जे दर दरपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहेत. त्यामध्ये कोणत्याही कारची अथवा अन्य वाढ देय होणार नाही.
10. सेवा पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे Advance Payment देय राहणार नाही.
11. Whatsapp Chatbot चे दरपत्रक सादर करताना त्यासोबत संस्थेचे GSTN Certificate, संस्थेचा लगतच्या एक वर्षाचा ITR, संस्थेचे उद्योग आधार प्रमाणपत्र, संस्थेचा ई-मेल व संस्थाप्रमुखांचा मोबाईल नंबर व पत्ता दरपत्रकासोबत जोडण्यात यावेत.
12. दरपत्रके सादर करताना वरील नमुन्यात सर्व करासहित नमूद करुन सादर करावीत.
13. सदर कामाचे दरपत्रके सिल बंद लखोट्यात, लखोट्यावर **"Quotation For Whatsapp Chatbot"** असे नमूद करुन विहित मुदतीत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. दरपत्रके वेळेत या कार्यालयास प्राप्त न झालेस ती स्विकारली जाणार नाही. दरपत्रकामधील दर हे सर्व करासहित नमूद करण्यांत यावेत.
14. **दरपत्रके दिनांक**- 07/01/2026 **रोजी सायं**. 6.00 **वाजेपर्यंत "मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी** (साप्र), **चौथा मजला, जिल्हा परिषद सातारा, सातारा-कोरेगांव रोड, पिनकोड**-415001" **या पत्त्यावर पाठविण्यात यावीत**.

एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवण्यांत आला आहे.

Place- Satara

Date - 30 /12 /2025

**(निलेश घुले)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रति,

1) ------------------------------------------------------------------------

प्रत- कार्यालयीन नोटीस बोर्ड, सामान्य प्रशासन विभाग, जि.प.सातारा

प्रत- माहिती व तंत्रज्ञान कक्ष, सा.प्र.वि.जि.प.सातारा

2/- सदर जाहिर दरपत्रक मागणीपत्र जि.प.वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावे.